महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ च्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपील अधिकारी घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक:गृहआ-२०१५/प्र.क्र.३१३/आस्थापना-२,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २०.०७.२०१५.

वाचा :-

१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश -२०१५, दि.२७.४.२०१५.
२) २) शासन अधिसूचना, गृह विभाग, क्र.एचडीओ-०२१५/प्र.क्र.३७/आस्था-१, दि.१० जुलै, २०१५.

शासन परिपत्रक

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या पोलीस प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ दि.२७.४.२०१५ पासून लागू केला आहे. सदर अध्यादेशाच्या अनुषंगाने गृह विभाग, अधिसूचना क्र.एचडीओ-०२१५/प्र.क्र.३७/आस्था-१, दि.१० जुलै, २०१५ अन्वये, पात्र नागरिकांकरिता असलेल्या सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. यामध्ये १) विदेशी कलाकारांच्या सहभागास परवानगी, २) कागदपत्रांचे साक्षांकन, ३) भारतीय नागरिकांसाठी “नोरी”(NORI) प्रमाणपत्र ४) पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र आणि ५) विदेशी नागरीकांचे नागरीकत्वाचे प्रस्ताव केंद्र शासनास पाठविणे या सेवा विहित कालमर्यादेत पार न पडल्यास यावर प्राप्त होणाऱ्या अपीलावर कार्यवाही करण्यासाठी सदर अध्यादेशानुसार **प्रथम अपील अधिकारी म्हणून श्री. सु.ना. पवार, अवर सचिव व व द्वितीय अपील अधिकारी म्हणून श्री. सु.कि. निकम, उप सचिव** यांना नियुक्त करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०७२४१७५९२१०६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Punam Hiraman Wagde

Digitally signed by Punam Hiraman Wagde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Punam Hiraman Wagde
Date: 2015.07.29 13:24:09 +05'30'

(पु.हि.वागदे)
सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई,
२. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
५. अपर मुख्य सचिव (परि. व बंदरे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६. प्रधान सचिव (अ.व सु.), गृह विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
७. प्रधान सचिव (राउशु) यांचे स्वीय सहायक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गो.ते. रुग्णालय, मुंबई,
८. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. सह सचिव (आस्था-२), गृह विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२,
१०. सर्व सह सचिव /उप सचिव, अवर सचिव / सर्व कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
११. श्री. सु.कि. निकम, उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१२. श्री. सु.ना. पवार, अवर सचि, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१३. वैयक्तिक नस्ती / निवड नस्ती.
